**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**

==========================================================================

**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024**

==========================================================================

# संत तुकाराम : आध्यात्मिक आकलन

**डॉ. गणेश मोहिते**

मराठी विभाग देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

संत ज्ञानेश्वरांनी भागवत सांप्रदायाचा पाया घातला आणि भक्तीच्या पातळीवर समानतेचा अनुभव देत पारमार्थिक उन्नती साधली . या सांप्रदायाचा कळस होण्याचा मान संत तुकारामांकडे गेला. धर्माचे खरे स्वरूप प्रकट करण्याची इच्छा आणि गरज हा उद्देश त्यामागे होताच शिवाय ' अध्यात्म ' ही संकल्पना अधिक स्पष्ट करण्याची उत्कट प्रेरणाही यामागे होती . भक्तीचा सोपा मार्ग दाखविताना कर्मकांडांना दूर सारून ईश्वरी उपासनेची ' रीत ' संतांनी घालून दिली. हा भक्तिमार्ग संसारापासून दूर न जाता कर्मकांडांचा आग्रह न धरता नैतिकतेच्या पायावर उभा राहणारा आहे . यासाठी कीर्तने , प्रवचने , भारुड , गवळणी अशा सर्वसामान्य जनतेशी जवळीक साधणाऱ्या माध्यमातून संतांनी हा ठेवा चिरकाल टिकविला आहे . आध्यात्मिक ज्ञानाची लालसा असलेल्या बहु जनांना' आध्यात्मिक समता ' आणि ' ईश्वर भक्ती ' हे दोन्ही महत्त्वपूर्ण वाटत होते. शिवाय हे स्वातंत्र्य अग्रक्रमाने घेण्याचा अट्टाहासही होता. भक्तीसाठी समाजाची चौकट विस्कळीत न करता भक्तीचा धोपट मार्ग संतवाणीतून परावर्तित झाला . समाजाला ईश्वर भक्तीत रमता आले ; भक्तीचे स्वातंत्र्य उपभोगता आले . ही अध्यात्मिक दृष्टी जाती - धर्माच्या चौकटींना भेदत सामान्य माणसालाही प्रतिष्ठा मिळवून देणारी आहे. हीच दृष्टी माणसाला माणूस म्हणून बघताना विश्वव्यापी विचार मांडणारी आहे . भागवत धर्माने अध्यात्मिक पातळीवर एकात्मता निर्माण केल्यामुळे सर्व समाज परमेश्वराचे एकमुखाने नामस्मरण करू शकले. यात संतविचार - भक्तीविचार सांगतांना मानव कल्याणाची तळमळ ' देह देऊळ आत्मा राऊळ ' सांगत मानवी जन्माचे सार्थक होण्यासाठी आध्यात्मिक आनंदात संतांना रंगता आले आणि भक्तांना रमविता आले.

संतांचा अध्यात्मिक विचार मानवतावादी असण्यासोबतच स्वातंत्र्य , समता , स्त्री - पुरुष समानता आणि निष्कामकर्म अशी मूल्ये जोपासणारा होता . पुरोगामी असलेला उदात्त विचार बहु जनसमाजातील संवेदनशील भक्तांना रुचणारा आणि पचणाराही होता . संत तुकारामांनीही ज्ञानाचा महिमा सांगत ' भवसिंधू तरावयासाठी हरी हा मनात नित्य आठवावा ' असे सुचविले आहे म्हणूनच ते म्हणतात ,

तुका म्हणे ऐसा नामाचा महिमा ॥
राहील जो नेमा तोची धन्य ॥ १ ॥

अंत:करणातील सुखाला अधोरेखित करताना पाप , ताप , दैन्य उरत नाही तर उलट जीवाचा जिव्हाळा जपता येतो . माणसातला माणूस ओळखता येतो . असे संत तुकाराम आपल्या अभंगातून निरूपण करतात . एकूणच जीवनात नीती विचाराला महत्त्वाचे स्थान देणारे लोककल्याणाची तळमळ उरी घेऊन आपल्या अभंगातून प्रतिभेचा प्रत्यय देणारे लोकाभिमुख संत तुकाराम म्हणूनच कळसस्थानी असल्याचा प्रत्यय त्यांचे आकलन होत असताना येतो . ज्या - त्या काळात लेखन केले जाते त्या कालमानांचा परिणाम त्यावर होताना दिसतो. सत्व स्वीकारलेले लेखन संपन्नता आणि व्यामिश्रतेचे भान देते . तुकारामांच्या अभंगातून हे भान

नव्याने स्वीकारता येते . एकूणच त्यांच्या विचारांचे अधिष्ठान नैतिकतेवर अवलंबून आहे . मानवी जीवनात नीती विचाराला सर्वोच्च स्थान असले पाहिजे हा आग्रहही वारकरी संप्रदाय धरताना दिसतो. संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात ,

तुका म्हणे विधी निषेधलोपला ॥
केले धर्माचे निर्मूल। प्रलयकार आरंभिला ॥१॥

अशी समाजाची स्थिती असताना आपल्या भोवतीचे जग वाईट मार्गाला लागू नये , त्यांनी भक्ती करावी ' बुडते हे जन न देखवे डोळा ' अशी त्यांची अवस्था झाली होती . म्हणूनच दृष्टाला कितीही उपदेश केला तरी तो त्याच्यासाठी फलदायी ठरत नाही. दुर्जनांची संगती सोडून सज्जनांशी मैत्री करणारा उपदेश ते देतात . संत तुकारामांच्या काळात मतलबी गुरु व आळशी साधक यांचा सुकाळ झाला होता तेव्हा कर्मकांड करणाऱ्यांना तुकारामांनी चांगलेच धारेवर धरले होते . अशा भोंदू गुरूंनी आणि आळशी साधकांनी समाजाला छळले होते. अज्ञानी , अडाणी समाजाला चांगले धर्मज्ञान न देता त्यांची देवाच्या व धर्माच्या नावाखाली लुबाडणूक होऊ लागली होती . त्यांच्या अंगी असलेल्या आळसाने कोणत्याही प्रकारची उपासना न करता फळ देणारा गुरु त्यांना हवा होता . या सर्वांमुळे तत्कालीन समाजाचे मोठे नुकसान झाले होते . हे तुकारामांनी जाणले . ते म्हणतात ,

ऐसे कैसे झाले भोंदू ।
कर्म करोनी म्हणती साधू ॥
अंगा लावूनिया राख ।
डोळे झाकून करितो पाप ॥

यामुळे सत्याचा नाश व नीतीची माघार असा समतोल बिघडल्याचे ते आपल्या अभंगातून स्पष्ट करतात . अध्यात्मात अनैतिक मूल्य बाधा आणतात . निष्कामकर्म संत तुकाराम सुचवितात . कीर्तनाच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन ते करतात . सामाजिक जागृतीसाठी आणि भक्तीचा , अध्यात्माचा प्रसार करण्यासाठी तुकोबांना कीर्तनसंस्था अधिक उपयुक्त वाटते . विषमते विरुद्ध विद्रोह करण्याचे सामर्थ्य या संस्थेत आहे असा विश्वास संत तुकारामच नाही तर अवघ्या वारकरी संप्रदायाला आहे . आणि तो सतत सार्थ ठरत गेला . म्हणूनच गेला १२ व्या शतकापासूनची ही परंपरा व सेवा अखंडित चालू आहे .

' अध्यात्म ' म्हणजे ' आत्म्याला आनंद देणारा ' असाही एक अर्थ घेऊन सामाजिक व मानसिकतेच्या विस्कटलेल्या घडीला सुरळीत करण्याचा प्रयत्न त्यांच्या अभंगांमधून झालेला दिसतो . संत तुकारामांच्या रचनेत मानवी स्वभावाला व विसंगतीला अधोरेखित केलेले दिसते . त्यांचे शस्त्र घायाळ करण्यापेक्षा अंतर्मुख होऊन विचार करण्यास प्रवृत्त करणारे ठरते . परखड आणि स्पष्टवक्तेपणा ही संत तुकारामांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत . संत तुकाराम ' साधुत्व ' ही मनाची उच्चतर अवस्था मानतात . दया, क्षमा , शांती आणि प्रेम जिथे वास करते आणि ज्यांच्या मनात आत्मियता आहे ते या साधुत्वाच्या कसोटीवर खरे उतरतात . मानवी स्वभाव आणि असंबद्धता या संदर्भात वा. ल. कुलकर्णी म्हणतात , " मनुष्य प्राण्यांच्या स्वभावाचे निरीक्षण केले असता त्या स्वभावांना रंग आणणारी अशी असंबद्धता आपणास त्या - त्या ठिकाणी आढळून येते . अशी असंबद्धता शोधून काढणारी दृष्टी सहानुभूतीपूर्णअसते . ही दृष्टी संत तुकाराम महाराजांच्या निरीक्षणात दिसून येत असली तरी ती सहानुभूतीपूर्णदृष्टी नसून स्पष्टवक्तेपणा व निष्क्रिय समाज व्यवस्थेला जागृत करणारी

कठोर , परखड अनुभवाने आलेली दृष्टी आहे असे म्हणता येईल." थोडक्यात संत तुकारामांच्या लेखन शैलीतून वास्तव मांडताना सर्वसाधारण जन माणसाला पटवून देण्यासाठी त्यांनी दिलेले दाखले , दृष्टांत समाज जागृत करण्याचा त्यांचा प्रयत्न विलक्षण सामर्थ्य प्रदान करणारा आहे . तुकारामांच्या लेखनातून येणारे कृषी संदर्भही अध्यात्माचे अनुषंग म्हणून येतात . अध्यात्माची भाषा समजावून सांगताना ते जाणीवपूर्वक कृषी जीवनातील संदर्भ निवडताना दिसतात. म्हणूनच ते म्हणतात ,

शुद्ध बीजा पोटी । फळे रसाळ गोमटी ।
मुखी अमृताचीवाणी । देह वेचावा कारणी ॥

ही रूपकात्मकता बीजाचे महत्त्व सांगण्यासोबतच आध्यात्मिक चिंतनही अनुभवरूप घेऊन प्रकट होते.

संत तुकाराम साक्षात्कारी निर्भीड होते . कर्मठ , वैचारिक व व्यवहारिक प्रवृत्तींवर हल्ले चढवत ते अध्यात्माची परिभाषा सोपी करण्यावर भर देताना दिसतात . महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे एका अर्थी संवर्धन करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने होताना दिसतो. प्रमाण्यवादी तुकोबांनी अंधश्रद्धांना कधीच थारा दिला नाही . उलट भक्ती मार्गाची वाट दाखवत समाज जीवनाचे डोळस निरीक्षण करणारे , ईश्वर चिंतन करणारे ते अनुभवी तत्त्वचिंतक होते .

**संदर्भ ग्रंथ**

१ . मांदियाळी - डॉ. उषा देशमुख
२. संतसाहित्य नवचिंतन- डॉ. यू . म . पठाण
३. वारकरी पंथाचा इतिहास - शं. वा. दांडेकर
४ . संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती - गं. बा. सरदार